# घरकुल आनंदयात्रा

त्रैमासिक पत्रिका
अंक १ ला (एप्रिल-मे-जून २०२३)



आनंद नगर, त्रिंबक रोड, पिंपळगाव बहुला, नाशिक - ४२०२१३ I संपर्क : ९८६०५५२३२४
Email : gharkulparivar@gmail.com I Web : www.gharkulparivar.org


## शुभारंभ ..

सप्रेम नमस्कार,

घरकुलची स्थापना होऊन बोलता बोलता अठरा वर्ष झाली. अक्षरश शुन्यातून घरकुलची निर्मिती झाली. या शुन्याच्या अलीकडे आपल्यासारखे अनेकजण उभे राहिले आणि शुन्याचे मोल वाढत गेले.

ही अठरा वर्षाची वाटचाल वळणदार होती. ह्या वाटचालीत अनेक संकटे आली. अडचणी आल्यात पण घरकुल परिवाराने त्यातून वाट काढली. मानसिक दिव्यांग मुलींच्या आयुष्यात आनंद निर्मिती करणे हेच घरकुलचे ब्रीद आहे, श्वास आहे.

आपणा सर्वापर्यंत घरकुलचा हा आनंदमय प्रवास पोहचावा म्हणून 'घरकुल आनंदयात्रा' या त्रैमासिक पत्रिकेचा शुभारंभ करीत आहोत. या माध्यमातून दर तीन महिन्यांनी आपल्याशी संवाद साधता येईल. इथे संपन्न होणारे कार्यक्रम, काही विशेष उपक्रम, घरकुलच्या आरंभापासून आतापर्यंत घरकुल मध्ये आलेल्या एक एका मुलींची गोष्ट. दैनंदिन वातावरणातील गमती जमती ज्या मुलींच्या निरासगतेमधून घडून येतात. घरकुलच्या उभारणीतील आधारस्तंभ विश्वासू सहकारी, भेटी गाठी, मोलाचे सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था प्रती कृतज्ञता, पालकांची मनोगते अशा विविधांगी सदरांनी ही आनंदयात्रा सजणार आहे.

हि पत्रिका आपल्या पर्यंत पोहचवताना आमच्या संपादक मंडळातील सर्वांचे सहकार्य मिळाले. संकल्पनांची देवाण घेवाण होऊन हा पहिला अंक आपल्या हाती देतांना आम्हाला आनंद होत आहे. देणगीदार, पालक व हितचिंतक या सर्वांना कृतज्ञता पुर्वक नमस्कार.

या अंकाविषयी आपला अभिप्राय सूचना आम्हाला नक्कीच प्रेरणादायी ठरतील.

**धन्यवाद!**

## घरकुल परिवार संस्था

### -: कार्यकारिणी सदस्य :-

| नाव | पद |
|---|---|
| श्रीमती. सुनिता अशोक आडके | अध्यक्ष |
| डॉ. शिरीष मधुकर सुळे | उपाध्यक्ष |
| श्रीमती. विद्या आनंद फडके | सचिव |
| श्रीमती. पल्लवी अमर वैद्य | खजिनदार |
| श्री. उमेश लक्ष्मीनारायण राठी | सभासद |
| श्रीमती. सारीका आदित्य केळकर | सभासद |
| श्रीमती. वल्लरी अंबर प्रधान | सभासद |
| श्रीमती नीता मिलिंद जांभोटकर | सभासद |
| डॉ. ऋचा शिरीष सुळे | सभासद |
| ॲड. क्षमा लक्ष्मीकांत संगमुळी | सभासद |
| श्रीमती. अनुराधा देविदास देशपांडे | सभासद |
| श्री. नरेश महाजन | सभासद |
| श्रीमती. साधना देशमुख | सभासद |

* * *

### -: संपादकीय मंडळ :-

सौ. सुनिता आडके

सौ. विद्या फडके

श्री. नरेश महाजन

सौ. साधना देशमुख

सौ. वल्लरी प्रधान

सौ. सोनल खाडिलकर

* * *

# घरकुलची कहाणी

## असा झाला प्रारंभ

आटपाट नगर होतं, नाव होतं नाशिक! तिथे काही कुटुंबात मानसिक दिव्यांगत्व असलेल्या, निर्सगाने वंचित केलेल्या मुलं–मुली होत्या. तिथेच एक डॉ. मोहन वाडकर नावाचे सद्गृहस्थ राहत. त्यांचीही श्रृती नावाची मुलगी अशीच विकलांग होती.

डॉ. वाडकरांचं वय मावळतीला झुकू लागलं होतं. पत्नीदेखील थकली होती. त्यांना श्रृतींचं पुढं काय हा प्रश्न स्वस्थ बसू देत नव्हता. त्या सुमारास नाशिकमध्ये प्रबोधिनी ही मानसिक दिव्यांग मुलामुलींची शाळा होती. तिथे मी व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरची संचालिका म्हणून काम करत होते. माझा या क्षेत्रातील प्रदिर्घ अनुभव बघून श्रृतीचे बाबा आणि काही पालक म्हणू लागले 'बाई, आमच्या नंतर आमच्या मुलींना सांभाळणारी काही तरी सोय हवी' त्यांच्या या विचारामागील तळमळ मला अस्वस्थ करी. मुळात हळवं मन या मुलींच्या काळजीनं अधिकच व्यथित होई. काहीतरी करायलाच पाहिजे हा विचार मूळं धरु लागला आणि 'होम अवे फ्रॉम होम' या धारणेवर आधारलेल्या घरकुलाच्या कहाणीचा प्रारंभ झाला.

मी हा विचार संपर्कातील काही अनुभवी व्यक्तिंना बोलून दाखवला. ज्यात श्री. व सौ. डॉ. सुळे, सौ. सुनिता आडके, सौ. वैदेही देशपांडे, मा. श्री. महाराज बीरमांनी यांच्या प्रामुख्याने समावेश होता. या मान्यवरांशी गांभीर्याने सांगोपांग चर्चा करुन अनेक मिटींग्स व चर्चा झाल्या आणि 'घरकुल' साकारलं गेलं. या मानसिक दिव्यांग मुलींना घराप्रमाणे प्रेम, आत्मियता, जिव्हाळा, सुरक्षितता, विश्वास देणारे दुसरे घर १ नोव्हेंबर २००६ मध्ये प्रत्यक्षात अस्तित्वात आले.

सुरवातीला प्रायोगिक स्तरावर श्रृती सह आणखी तीन मुली होत्या. त्यांच एक महिन्याचं निवासी शिबिर घेतलं. त्यांच राहणं खाणं पिणं, दिवसभराचं रुटीन, येणाऱ्या अडचणी हे सार लक्षात आलं. महिन्याभरानंतर मुली जेव्हा घरी गेल्या तेव्हा त्यांना मैत्रिणींची आठवण येऊ लागली. आम्हाला एकत्र राहायच म्हणून त्या रडू लागल्या आणि तेव्हा सगळ्यांच्या लक्षात आलं, यांना बौद्धिकदृष्ट्या निसर्गानं वंचित केल असलं तरी यांच्यात परस्परांना निरागसपणे जीव लावण्याचा गुण मात्र निसर्गाने मुक्तहस्ते बहाल केला आहे. त्याच क्षणी यांच्यासाठी एक घरट उभारण्याच्या धडपडीने वेग घेतला.

मुलींसाठी राहण्याची सोय करायची म्हणजे घर हवं, शोध चालू झाला. नाशिक रोड ला 'आऊ माऊ' हा बंगला सर्व दृष्टिने पसंत पडला. पण त्याचं भाड कसं परवडायचं? मग पुन्हा देवळालीचे प्रसिध्द उद्योगपती घरकुलचे गॉडफादर महाराजजी बिरमानी यांना भेटलो. त्यांनी लगेच तीन वर्षाचं भाडे भरण्याची तयारी दाखवली. आता पुढचा प्रश्न होता मुलींना राहायची व्यवस्था म्हणजे जेवण, गाद्या, कॉट, भांडी, कुंडी ह्या सामानाचं काय? म्हणतात ना इच्छा असेल तिथे मार्ग सापडतो तसंच झालं. रोटरी क्लब देवळाली, इनरव्हील, राजस्थानी लेडीज ग्रुप यासारख्या संस्थानी आम्हाला सर्वतोपरी मदत केली आणि घरकुलचं हे कुटुंब हळूहळू स्थिरावू लागलं.

महाराष्ट्रातील आणि आता तर अन्य राज्यातील मानसिक दिव्यांग मुली घरकुलात दाखल होत आहेत. ही घरकुलाची कहाणी आपल्यापुढे मांडतांना सुख–दु:खाच्या अनेक प्रसंगांची उजळणी होत आहे. हा अनुभव आपणा सर्वांसमोर मांडून मन हलके करावेसे वाटले!

**धन्यवाद!**

---



*।। श्री गणेशाय नम: ।।*

घरकुलमधील आमच्या विद्यार्थीनींनी तयार केलेल्या शाडू मातीच्या गणेश मुर्ती विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

आपण प्रत्यक्ष भेट देऊन मुर्तीचे बुकींग करु शकता.

धन्यवाद !

संपर्क : ९८६०५५२३२४ / ९०११५३०२०४

# घरकुलचे आधारस्तंभ



**श्री. महाराज बिरमानी** यांना आम्ही घरकुलचे गॉडफादर मानतो. महाराज बिरमानी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी रोमाजी यांचे कार्य खूप मोठे आहे. महाराज बिरमानी हे खरगपूर आय आय टी चे १९६६ सालचे गोल्ड मेडॅलिस्ट, अत्यंत कुशाग्र, बुद्धिमत्ता व दूरदृष्टी असलेले महाराज बिरमानी यांनी १९७१ साली देवळाली येथे ''शिवानंद इलेक्ट्रानिक्स'' ही कंपनी सुरु केली. या कंपनीत मेटल डिटेक्टर साधनांची निर्मिती होते. भारतातल्या त्या काळी सुरु झालेल्या या उत्पादनात बिरमानी यांचे ही कंपनी अग्रगण्य होती. त्यांच्या कंपनीत निर्मिती झालेली मेटल डिटेक्टर साधने लोकसभा, राज्यसभा येथील प्रवेशाच्या ठिकाणी तसेच भारत पाक सिमारेषा येथे बसवले गेले. एवढेच नव्हे तर जगातील ७० देशांमध्ये ही साधने निर्यात केली जातात.

एकीकडे ही उद्योजकता जोपासत असताना ते सामाजिक दायित्व देखिल पार पाडत आहेत. देवळाली येथे त्यांनी मोफत दवाखाना सुरु केला आहे. रोटरीच्या माध्यमातून २५ वर्षापूर्वी मोफत पूरी भाजी केंद्र सुरु केले. ते आजही देवळाली मधील गरजूंची भूक भागवत आहे.

घरकुल सुरु करायचं हे नक्की झाल होतं. नाशिकरोड येथील आऊ माऊ हा बंगला रहिवास म्हणून मनात भरला होता. पण मोठा प्रश्न होता तो त्या बंगल्याचं भाडं ते कसं आणि कुठून भरायचं? त्याचवेळी महाराज बिरमानी यांच्या सामाजिक योगदानाविषयी ऐकले होतं. मग आम्ही त्यांना भेटण्यासाठी देवळाली मधील त्यांच्या घरी गेलो. त्यांना सर्व माहिती सांगितली. त्यांनी एका क्षणात 'आऊ माऊ' बंगल्याचं भाडे तीन वर्षापर्यंत भरतो, तुम्ही घरकुल सुरु करा असा शब्द दिला. खुप मोठा आधार मिळाला आणि 'आऊ माऊ' मध्ये घरकुल १ नोव्हेंबर २००६ ला सुरु झाले.

पुढे जेव्हा घरकुलाची स्वत:ची वास्तू जिथे उभी आहे. ती जागा विकत घ्यायची होती. तेव्हाही महाराज बिरमानी यानांच सर्वप्रथम याविषयी सांगितले त्यांनी अगदी आनंदाने अकरा लाख रुपयांचा पहिला चेक दिला. अशाप्रकारे घरकुलच्या उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांच्या अमृतस्पर्शाने श्री गणेशा झाला. पुढे या जागेवर बांधकाम सुरु करण्यासाठी निधी उभारतानाही पहिली देणगी त्यांच्याकडून प्राप्त झाली. महाराज बिरमानी यांचा घरकुलला पाठिंबा हा केवळ आर्थिक नाही तर घरकुलच्या वाटचालीत त्यांचे वडिलकीचे अनुभवी मार्गदर्शन देखिल घरकुलला नेहमीच मिळत असते. बांधकामासाठी निधी उभारताना त्यांनी एक मोलाचा सल्ला दिला. 'घरकुलच्या उभारणीत तुम्ही समाजातील विविध स्तरांमधील लोकांकडून मदत घ्या. ज्यामुळे संस्था समाजाभिमुख होईल.' हा सल्ला आम्ही सर्वांनी शिरोधार्य मानला. आज घरकुलला मदतीचे असंख्य हात लाभलेत.

असे हे महाराज बिरमानी घरकुलला भेटलेले देवमाणूस! त्यांचा वरदहस्त आमच्यावर कायम रहावा हीच प्रार्थना आणि कृतज्ञतेचा नमस्कार!

**विद्या फडके**

---

## कृतज्ञतेचा नमस्कार ...

एखाद स्वप्न पुर्ण करण्याचा जेव्हा आपण मनापासून ध्यास घेतो तेव्हा ते स्वप्न पुर्ण करण्यासाठी सगळं विश्व तुम्हाला सहाय्यभूत होतं अस म्हणतात ते खोट नाही. घरकुल सुरु झाल्यापासुन ते आतापर्यंत अनेक कंपन्या व्यक्ति संस्था यांच्याकडून वेगवेगळ्या स्वरुपात योगदान व सहकार्य मिळाले. त्यामुळे १७ – १८ वर्षाचा हा प्रवास सोपा झाला. समाजाच्या सर्व स्तरातून मिळालेल्या सहयोगामुळे, प्रेमामुळे आमच्या मुलींना आम्हाला आनंददायी व दर्जेदार वातावरण देता आले. यामुळे घरकुल रुढार्थाने एक संस्था न राहाता एक मोठं संयुक्त कुटुंब बनलं आणि आश्वासक वाटचाल करित आहे. त्यासाठी भविष्यातही आपणा सर्वांची साथ, सहकार्य, जिव्हाळा हवा आहे.

आपल्या प्रत्येकाच्या प्रति आमच्या मनातल्या भावना शब्दात मांडणे कठीण आहे. मात्र आपल्या प्रत्येकाच्या प्रेमाची नोंद आम्ही मनोमनी जपत राहू. सर्व ज्ञात, अज्ञात मान्यवरांना, हितचिंतकांना, देणगीदारांना धन्यवाद व कृतज्ञतेचा नमस्कार!

घरकुल आपल्या सर्वांप्रती ऋणी आहे. तसेच आपणा सर्व मान्यवरांचे स्नेहीजनांचे घरकुलात कायम स्वागत आहे.

## एकेकीची गोष्ट : श्रुती वाडकर

होय इथे आलेल्या एका मुलीची गोष्ट तुम्हाला सांगायलाच पाहिजे. त्यामुळेच घरकुलने या मुलींच्या आयुष्यात काय दिले हे नेमके कळेल. पहिली विद्यार्थिनी श्रुती वाडकर. तिच्या बाबांमुळेच घरकुलचा प्रारंभ झाला. त्यावेळेस त्यांनी सत्तरी ओलांडली होती. श्रुतीची आई अंथरुणाला खिळून होती. त्यामुळे पुढील भविष्य काय या काळजीने व्यथित झालेले मोहन वाडकर यांनी घरकुल उभारण्यात मोठा पुढाकार घेतला.

श्रुती घरकुलात दाखल झाली. अतिशय हट्टी होती सुरुवातीला दोघींनी मिळून तिला उठवावं लागत होत. तिला सांभाळणे हे एक कौशल्याचे काम होते. पण घरकुल मधीत एकूण वातावरण, इतर मुलींचा सहवास आणि मनमोकळेपणा यामुळे तिच्यात खूप बदल होत गेला. तिचा हट्टीपणा कमी झाला ती उत्साहाने काम करू लागली. स्वभावाने अतिशय आक्रमक असलेली श्रुती अतिशय शांत, समजूतदार झाली. इतरांचं ऐकू लागली. तिच्या बोलण्यात सुधारणा झाली आता तिला इथे अनेक मैत्रिणी आहेत. तीही अनेकांना आवडते गुलाबजाम, गोड पदार्थ तिला खूप आवडतात.

जाता जाता एक आठवण सांगितल्याशिवाय रहावत नाही. घरकुलचे पहिले पालक मोहन वाडकर यांचे घरकुलवर अतिशय प्रेम होते. ते आजारी होते तेव्हा मी अमेरिकेत होते. त्यांचा तिथेही फोन आला होता. ''बाई कधी येत आहात?'' भारतात माझे येणे जरा आठ दिवस लांबले पण मी ज्या दिवशी आले त्या दिवशी आल्या आल्या प्रथम वाडकरांकडे केले. ते माझ्याशी बोलले. त्यांनी आपल्या पेन्शनचे सर्व कागद मला दिले. घरकुलची चौकशी केली आणि काय दुर्दैव बघा ... त्याच दिवशी त्यांनी जगाचा निरोप घेतला. घरकुलच्या प्रेमापोटी ते माझ्या भेटीसाठी थांबले होते की काय असे सारखे वाटते. घरकुलच्या निर्मितीचे मूळ श्रेय जाते ते या वाडकरांना.

त्यांना विनम्र अभिवादन!

**विद्या फडके**



## –: विश्वासू सहकारी :–

### श्रीमती आशा चंद्रात्रे

घरकुलची १६ – १७ वर्षाची वाटचाल आश्वासक आणि आशादायी होण्यात पाठीशी भक्कमपणे उभी असणारी मोठी माणसं आहेतच पण त्याच बरोबर घरकुलच्या दैनंदिन व्यवहारात मिळालेल्या विश्वासू आणि प्रेमळ मावश्या ताया यांची खूप मोलाची भूमिका आहे. यात घरकुलच्या उभारणीपासून सोबत असलेल्या 'आशा मावशी म्हणजेच आशा चंद्रात्रे' यांचा उल्लेख केला पाहिजे. पतींच्या निधनाचा कौटुंबिक आघात झाल्यानंतर एका दुरच्या नातेवाईकाच्या बरोबर आशा घरकुलमध्ये आली ती काम मागायला, नंतर तीची गरज लक्षात घेऊन तीला काम दिले. ती बिऱ्हाड, भांडीकुंडी व देव घेऊन आली आणि घरकुलचीच 'आशा मावशी' झाली.

आशा घरकुलमध्ये आली तेव्हा ती बोलायला घाबरायची स्वतःच नाव पण सांगू नाही शकायची.पण हळू हळू तिला घरकुलने इतका आत्मविश्वास मिळवून दिला की आज घरकुलची स्टोअर इनचार्ज आहे. घरकुलच्या कमळगटातील ७ मुलींची ती केअर टेकर असून आगदी आपुलकीने काळजी घेते. घरकुल अशा सेवाभावी आणि प्रेमळ मावश्यांमुळे आमच्या मुलींना प्रेमाने सांभाळू शकते. ह्या अश्या सहकारी ही घरकुलाच्या वाटचालीतील मोठीच कमाई आहे.

### गंमत जंमत

*कधी कधी मुली खूप गंमतीशीर बोलतात. एक मुलगी धावत आली ''बाई बाई तो बोंबलला''*
*''अग झालं काय...?''*
*''टीव्ही बोंबलला''*
*''अगं म्हणजे नेमकं झालं काय?''*
*''बाई, अहो टीव्ही बंद पडला''*
*तिने 'बोंबलला' हा खास शब्द नेमका इथं ज्या पद्धतीने वापरला, ह्याची गंमत वाटली.*

*एका मुलीचा कान दुखत होता. तिला म्हणाले, ''आपण डॉक्टरांना दाखवू''*
*'नको, नको बाई. ते कापतात'*
*''अगं असं नसतं. कान कुणी कापत नाहीत. फक्त औषध टाकतील''*
*'तसं नाही बाई....ते पैशाला कापतात'*
*या तिच्या मार्मिक बोलण्याचे हासूही आले आणि कौतुकही वाटले.*

## ꧁ भेटीगाठी (एप्रिल मे जून) व मोलाचे सहकार्य ꧂

- श्री. व सौ. नितीन धोडपकर यांची घरकुलास भेट व उपयुक्त वस्तुरुप देणगी दिली
- घरकुलचे जुने हितचिंतक लायन्स क्लबचे श्री. सोमण यांनी श्री. ठक्कर यांच्यासह भेट दिली व देणगी देऊन मोलाचे सहकार्य केले.
- श्री. शरद साठे व सौ. साधना साठे (सोनल खाडीलकरचे आई वडील) यांनी घरकुलला सदीच्छा भेट दिली.
- आरंभ सोसायटी फॉर ऑटीझम ॲण्ड स्लो लर्नर चिल्ड्रन संस्था औरंगाबाद यांच्या पदाधिकाऱ्यांची संस्था पाहण्यासाठी भेट.
- D fit Dance Academy ने त्यांच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने संस्थेस भेट दिली व वाढदिवस साजरा केला.
- अशोका कॉलेजच्या विद्यार्थिनीची भेट व स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकीनबद्दल विद्यार्थिनीना माहिती दिली.
- सक्षम संस्थेचे पदाधिकारी व पालकांची घरकुलास भेट.
- अमेरिका स्थित पारेख व मोहिते कुटुंबियांची भेट व ज्यूट टेबल मॅट ची मोठी ऑर्डर देऊन मुलींच्या कामाला प्रोत्साहन दिले.
- 'दिल के करीब' हा युट्युब वरील घरकुलचा कार्यक्रम बघून मुंबईहून श्रीमती कर्णिक यांनी घरकुलला भेट दिली.
- S.M.R.K महिला कॉलेजच्या Human Develapment विभागाच्या विद्यार्थीनीनी घरकुलच्या मुलींसाठी युवती मेळाव्याचे आयोजन केले.
- आंबेडकर जयंती साजरी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून विद्यार्थीनींना देवमावशींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्याविषयी माहिती सांगितली.
- चित्पावन महिला मंडळ नाशिकरोड च्या २५ महिला सदस्यांनी घरकुलच्या मुलींसोबत चैत्र गौरी चे हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले.
- घरकुलचा वार्षिक स्नेहमेळावा संपन्न झाला. यात घरकुलचे सर्व हितचिंतक, देणगीदार, कार्यकारिणी सदस्य यांचा सहभाग होता. या प्रसंगी वीरमाता अनुराधा गोरे या प्रमुख पाहुण्या म्हणून आल्या होत्या. त्यांच्या हस्ते घरकुलच्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. अनुराधाताईंनी त्यांचे सैनिकांबरोबर केलेल्या कामाचे अनुभव कथन केले.
- इनरव्हील क्लब देवळाली व कराओके ग्रुप च्या वतीने घरकुलमधील मुलींसाठी गाण्याचा कार्यक्रम सादर केला.
- उन्हाळी सुट्टी पूर्वी पालक सभा आयोजित केली होती. विद्यार्थीनींनी खास पालकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.
- सुट्टीत घरकुलमध्ये राहणाऱ्या मुलींसाठी सहलीचे आयोजन केले. सोनलताई ने मुलींना पिझ्झाची रेसिपी शिकवली. मुलींनी पिझ्झा चा आनंद घेतला.
- Ultra Tech कंपनी तर्फे घरकुलमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग ची यंत्रणा (पाईपलाईन) बसविली गेली त्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते श्री. चिन्मय उदगीरकर यांचे हस्ते व अल्ट्रा टेक सिमेंट कंपनीचे अधिकारी तसेच नमामि गोदा फाउंडेशनचे श्री राजेश पंडित यांच्या उपस्थितीत पार पडले.
- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पार्कर लॉर्ड कंपनीतर्फे घरकुलमधील स्टाफ व विद्यार्थीनींच्या नावाने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला. याप्रसंगी सर्व उपस्थितांना घरकुलच्या खत प्रकल्पात तयार झालेले सेंद्रिय खत व कॅण्डल



**वार्षिक स्नेहमेळाव्याप्रसंगी प्रमुख पाहुण्या वीरमाता अनुराधाताई गोरे यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन संपन्न.**

देण्यात आले.

- AURA Celebrating Fashion 2023 नाशिक व INIFD नाशिक यांच्या तर्फे आयोजित Fashion Show मध्ये घरकुलच्या ८ विद्यार्थिनींना श्री जतींदर चिक्की यांनी संधी दिली व विद्यार्थीनींनी प्रथमच अशा स्वरूपाच्या फॅशन शो मध्ये सहभाग घेतला.
- 'योगारूट' या ज्योती सुराणा यांच्या ग्रुपतर्फे आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योग दिन साजरा झाला. सूर्यनमस्कार व प्राणायाम मुलींकडून करून घेतले. विद्यार्थिनींनी योगा डान्स सादर केला.
- इनर व्हील क्लब नाशिक (Main) च्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. सौ. देवधर यांनी काही निवडक योगासने प्रात्यक्षिके दाखविली व मुलींकडून करून घेतली. मुलींनीही गाणी कविता योगाडान्स इ. चे सादरीकरण केले.
- रिलायबल ऑटोटेक कंपनीच्या H.R Department च्या महिला कर्मचाऱ्यांनी घरकुलला भेट दिली. व मुलींसाठी व स्टाफसाठी गेम्सचे आयोजन केले. स्टाफ करता PPT द्वारे ' संस्थेची मुल्ये 'यावर संवाद साधला. त्यांनी मुलींना खाऊ व गिफ्ट्स दिल्या.
- रोटरी क्लब देवळाली येथील श्री नरेश जोशी यांच्या बटरफ्लाय फार्म हाउस वर घरकुलच्या सर्व मुली ताया, मावश्या यांची एकत्र सहल आयोजित केली होती. रोटरी क्लब ऑफ देवळालीचे अध्यक्ष श्री. अनिल कानडे, सचिव प्रा. सुनिता आडके, श्री नरेश जोशी व सौ मनीषा जोशी या सर्वांनी मुलींचे व स्टाफचे भव्य स्वागत केले. डान्स, गाणी व जादूचे प्रयोग ठेवले होते. घरकुलच्या विद्यार्थिनींनी गाणी व आदितीने डान्स सादर केला. सर्व मुलींसाठी हा खूप आनंददायी बदल होता. घरकुल ते देवळाली जाण्यासाठी फ्रावशी अकॅडमीचे श्री रतन लथ यांनी २ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या.
- आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. विठठल-रखुमाईच्या मूर्तीची पूजा व भजन अभंग म्हटले.
- 'आपुलकी ग्रुप' नांदेड यांच्यातर्फे श्री. सुनील पन्नामवार यांनी घरकुलला देणगी देऊन मोलाचे सहकार्य केले.
- नाशिकचे सुप्रसिध्द रेडिओलॉजिस्ट डॉ. कोतवाल यांनी संस्थेस देणगी देऊन बहुमोल सहकार्य केले.

**✻ थोरामोठ्यांचे मौल्यवान आशीर्वाद**

- नाशिकरोड येथील सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती साने आजी यांना घरकुल विषयी माहिती मिळाली. त्यांनी मदत करण्याची इच्छा म.टा. चे श्री तनपुरे यांच्याकडे व्यक्त केली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्या प्रत्यक्ष घरकुलला भेट देण्यास येऊ शकत नाहीत हे जाणून विद्याताई स्वतः त्यांना भेटण्यास गेल्या. साने आजींनी घरकुलच्या कार्यासाठी आशीर्वाद दिले व देणगी देऊन मोलाचे सहकार्य केले.

**✻ उपक्रम**

**काही पूर्वीचे तर काही नवीन उपक्रम या तीन महिन्यात राबविले गेलेत.**

- सौ. सुचेता महादेवकर या घरकुलच्या लेडीज विंगच्या सदस्या दर बुधवारी त्या शिक्षकांसाठी एक पुस्तक वाचन व त्यावर गप्पा असा उपक्रम घेतात. सध्या सुधा मूर्तीचे 'गोष्टी माणसांच्या' हे पुस्तक वाचन चालु आहे.
- या उन्हाळी सुट्टी पूर्वी फडके मॅडमनी एका नवीन उपक्रमाची माहिती दिली. घरकुलमधील सर्व मुलींचे साडी नेसून, छान तयार होऊन फोटो काढायचे व सुट्टीला घेऊन जाण्यासाठी पालक येतील तेंव्हा त्यांना फोटोची प्रिंट द्यायची यासाठी १० शिक्षकांना प्रत्येकी ५ मुली वाटून देण्यात आल्यात. पालकांना आपल्या साडी नेसलेल्या व नटून थटून तयार झालेल्या मुली बघून खूप भरून आले.
- पुणे येथील FAME University मधील आरुषी रायकर हिने घरकुलमध्ये Internship पूर्ण केली. तिच्या आजी आजोबांनी घरकुलास देणगी दिली.
- जून महिन्यात घरकुलच्या लेडीज विंग बैठक संपन्न झाली. त्यात दर गुरवारी आरतीसाठी आपल्या मित्र मंडळी, परिवारास घरकुलमध्ये आणायचे ठरले.
- एप्रिल महिन्यात दुबई येथे सौ आदिती मसुरकर व आदिती मराठे या घरकुलच्या स्नेही भगिनींनी घरकुलच्या 'प्रोडक्टस' चा स्टॉल लावला. या स्टॉलला खूप समाधानकारक प्रतिसाद मिळाला.

**✻ नवे सदस्य दाखल**

**घरकुलमध्ये या तीन महिन्याच्या कालावधीत ३ नवीन मैत्रिणींनी प्रवेश घेतला.**

- एप्रिल महिन्यात इंदोर येथील कु. करिश्मा जोशी हि घरकुलात आली. तिच्या नातेवाईकांना घरकुल विषयी यु-ट्युब व वर्तमानपत्रातून माहिती मिळाली.आज ती घरकुलच्या सर्व उपक्रमांत उत्साहाने सहभागी होतेय.
- जून महिन्यात कु.ज्योती नाकील हि बेंगलोर येथून घरकुलात आली.व चांगली रुळली.
- याशिवाय कु. पूर्वा भंगाडे हि पूर्णतः मूक-बधीर असलेली मात्र कलानिपुण असलेली मुलगी कलाशिक्षिका म्हणून दाखल झाली. तिचे ड्रॉईंग, पेंटिंग फारच सुंदर आहे.

---

**✻ आवाहन ✻**

**-: ऑनलाईन देणगीसाठी :-**

**देणगीस ८०जी अन्वये आयकरात सुट**

**A/C Name :** Gharkul Parivar Sanstha
**Bank Name :** Bank of India
**Branch :** Shivaji Udyan, Nashik
**A/C No. :** 080610110000256
**IFSC :** BKID0000806

# आनंद यात्रेतील क्षणचित्रे



Ultra Tech कंपनी तर्फे घरकुलमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग युनिटच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित प्रसिध्द मराठी अभिनेते चिन्मय उद्गीरकर व अन्य मान्यवर विद्यार्थीनीं समवेत



INIFD नाशिक यांच्या तर्फे आयोजित Fashion Show मध्ये घरकुलच्या विद्यार्थिनींचा सहभाग



उन्हाळी सुट्टी पुर्वी पालक सभेचे आयोजन



इनर व्हील क्लब नाशिक च्या वतीने आंतरराष्ट्रिय योग दिन साजरा करतांना



रिलायबल ऑटोटेक कंपनीच्या H.R Department च्या महिला कर्मचाऱ्यांची घरकुलला भेट



पार्कर लॉर्ड कंपनी तर्फे जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण कार्यक्रम



रोटरी क्लब देवळाली तर्फे श्रीमती विद्याताईंचा सत्कार करतांना श्री व सौ. जोशी



रोटरी क्लब देवळालीचे श्री. नरेशभाई जोशी यांच्या बटरफ्लाय फार्म हाऊस येथे घरकुलच्या विद्यार्थीनीसाठी पिकनिक व मनोरंजन कार्यक्रमाचे आयोजन

# आनंद यात्रेतील क्षणचित्रे




श्री. रायकर कुटुंबीयांची घरकुलला भेट



सक्षम संस्थेच्या पदाधिरकारी व विद्यार्थांची संस्थेस भेट




आरंभ इंस्टिट्युट फॅार ऑटीजम, औरंगाबाद
यांच्या पदाधिकाऱ्यांची संस्थेस भेट

**नकोच अबोला**

मैत्रीणींनो आपुल्यात
कधी नकोच अबोला
जरा जरा भांडू,पण
रूसवा कशाला....।

एका घरकुली
रहातो ... खेळतो
एका पंगतीत
हासत जेवतो
मग सांगा बरं आता
हा राग हो कसला
मैत्रीणींनो आपुल्यात
कधी नकोच अबोला

नाच करतो डौलात
हात हातात गुंफुनी
एका सुरात गातो
किती छान गाणी
कुणी जरासे बोलता
नको लागाया मनाला
मैत्रीणींनो आपुल्यात
कधी नकोच अबोला

सुट्टी वरी जातांना
येते ना डोळा पाणी
किती वाटते वाईट
दूर जातांना मैत्रिणी
खरे प्रेम काय
इथे कळते जगाला
मैत्रीणींनो आपुल्यात
कधी नकोच अबोला

कालच्या त्या गोष्टी
गेल्या कालच वाहूनी
रोज नव्यानं भेटावं
मिठी मारावी हासूनी
मैत्रीचा आनंद असा
सदा लाभो घरकुला
मैत्रीणींनो आपुल्यात
नको कधीच अबोला

**नरेश महाजन,नाशिक**